Maharashtra State
महाराष्ट्र शासन
# Services Preparatory Institute,
# सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था

N-12 Sector, Cidco, Chh Sambhajinagar Phone No 0240-2991370
एन-१२ सेक्टर,सिडको,छत्रपती संभाजीनगर दुरध्वनी क्र.०२४०-२९९१३७०
Web site :www.spiaurangabad.com E mail : sanchalakspi@gmail.com

## निवीदा नोटीस

सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर येथे मार्च-२०२६ ते जानेवारी-२०२७ पर्यंत अकरा महिन्याच्या करारपद्धतीने बाह्ययंत्रणेद्धारे खालील पदे भरण्याकरिता बंद लिफाफ्यामध्ये पोस्टाद्वारे अथवा प्रत्यक्षरित्या निविदा मागविण्यात येत आहेत. तरी ईच्छुकांनी निविदा विहीत मुदतीत दाखल करावी.

**१) शिपाई १ पद**
**२) ग्राऊंडस्मन १ पद**

| अ.क्र. | भरावयाचे पद | कालावधी | देण्यात येणाऱ्या वेतनाची वार्षिक अंदाजीत रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम २% | निविदा स्विकृती दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | शिपाई | ११ महिने | २,६५,०००/- | ५३००/- प्रथम देयकातुन | ०३/०२/२०२६ सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत | ०६/०२/२०२६ सकाळी ११.३० वाजता |
| २. | ग्राऊंडस्मन | ११ महिने | २,६५,०००/- | ५३००/- प्रथम देयकातुन | ०३/०२/२०२६ सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत | ०६/०२/२०२६ सकाळी ११.३० वाजता |

१. निविदाधारकांनी दिनांक ०३/०२/२०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत निविदा पोस्टाद्वारे अथवा प्रत्यक्षरित्या सादर करावी.

२. २% सुरक्षा अनामत रक्कम निविदा मंजूर झालेल्या पुरवठादाराच्या प्रथम देयकातून कपात करण्यात येईल. काही कारणास्तव ११ महिन्यापूर्वी करार रद्द झाला अथवा उपरोक्त नमूद पदे पुरविण्यात काही अडचण निर्माण झाली तर सदरहू सुरक्षा रक्कम पुरवठादारास परत केली जाणार नाही. पुर्ण करार संपुष्टात आल्यास सदरहू सुरक्षा रक्कम पुरवठादारास परत करण्यात येईल.

३. वरील निविदा सुचनेमध्ये बदल करणे किंवा निविदा काही कारण न देता नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांनी राखुन ठेवला आहे.

४. अटी, शर्ती व उपरोक्त नमुद पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या सोबत जोडल्या प्रमाणे राहतील.

पान नं. २ वर

५. **अटी व शर्ती** :-

अ. पुरवठादाराने कामगार आयुक्त कार्यालयात नोंदनी केलेली असावी.

आ. महाराष्ट्र दुकान व आस्थापना अधिनियम १९४८ नुसार आतागायत नुतनीकरणासह प्रमाणपत्र सादर करावे.

इ. निविदाकाराने निविदेमधील दोन्ही पदांना देण्यात येणाऱ्या मासिक वेतनाचे व कपातीचे दर भरणे बंधनकारक आहे.

ई. ज्या निविदाधारकांचे निविदा समितीमार्फत दर अंतिम केल्यानंतर निविदाधारकास रू.१००/- च्या स्टम्प पेपरवरती करारनामा करून देणे बंधनकारक राहील.

उ. जे निविदाधारक अंतिम होतील त्या निविदाधारकाने पुरविण्यात आलेल्या पदाच्या व्यक्तीचा इ पी एफ कपात करण्याची जबाबदारी ही निविदाधारकाची राहील.

ऊ. पुरविण्यात आलेले कर्मचारी कोणत्याही प्रकारचा नियमीत नियुक्तीचा दावा करू शकणार नाहीत.

ए. पुरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्याने काम करण्यास कुचराई केल्यास, त्याबदली दुसरा कर्मचारी देण्याची जबाबदारी ही पुरवठादाराची राहील.

ऐ. पुरवठादाराकडून पुरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्याची सर्वस्वी जबाबदारी ही पुरवठादारकाची राहील, याप्रकरणी कोणताही बोजा शासनावर राहणार नाही.

ओ. अटी नियम यांचा अर्थ लावण्याचा व निविदा/कंत्राटीमध्ये काही वाद निर्माण झाल्यास त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार संचालक, सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर यांना राहतील.

औ. वरील अटी व शर्तीनुसार कर्मचारी पुरवठ्याबाबत व देयकाबाबत वाद निर्माण झाल्यास मा.संचालक, सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर यांचा निर्णय अंतिम राहील. न्यायालयीन कामकाजाकरिता छत्रपती संभाजीनगर कार्यक्षेत्र मर्यादित राहील.

६. **पदांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या** :-

अ. **शिपाई**

कामाची वेळ सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.४५ वाजपर्यंत
कार्यालयात असलेले सर्व विभाग याची साफसफाई करणे.
कोषागारात संस्थेची देयके सादर करणे व त्या संबधीत इतर कामे करणे.
संस्थेतील झेरॉक्स मशिन चालवणे व मशिनीची स्वच्छता व देखभाल करणे.
संस्थेतील संगणक संच यांची स्वच्छता व देखभाल करणे.
वरिष्ठ अधिका-यांनी तथा कर्मचा-यांनी सांगितलेली कामे करणे.
बाहेरच्या इतर कार्यालयातील टपालाची देवाण घेवाण करणे.
संचालक महोदय यांनी सांगितलेली विविध कार्यालयीन कामे करणे.

आ. **ग्राऊंडस्मन**

कामाची वेळ सदर पद हे छात्रांच्या प्रशिक्षणाशी निगडीत असल्यामूळे संचालक महोदय यांच्या सुचनेनुसार.

संस्थेच्या शारिरीक प्रशिक्षण निर्देशकास खेळाचे मैदान तयार करण्यास मदत करणे व प्रशिक्षणाच्या साहित्याचा रखरखाव ठेवणे.

खेळाचे साहित्य खेळाच्या वेळी मैदानात आणणे व नंतर भांडारगृहात ठेवणे. काही साहित्य खराब झाले असल्यास, त्यास स्थानीक बाजारातून दुरूस्त करून आणणे.

वरील कामाव्यतिरीक्त संस्थेचे आवार मोठे असल्यामूळे संस्थेतील इतर परिसर स्वच्छ ठेवणे व निगा राखणे.

(मकरंद देशमुख)
कर्नल (निवृत्त)
संचालक